मासिक

# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे | ■ अंक ५ | ■ जुलै २०२५ | ■ मुल्य : २५ रु | ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. | ■ पान ४

## सोलापूर रस्त्यावर इराणचा ध्वज, खामेनींचा फलक

■ **लोणी काळभोरमधील प्रकार**

**पुणे** : इराण-इस्त्राइलमधील तणाव कायम असताना पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी काळभोर परिसरात इराणचा ध्वज आणि अयातुल्लाह खामेनी यांचे छायाचित्र असलेला फलक लावण्यात आल्याने खळबळ उडाली. पोलिसांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर ध्वज आणि खामेनी यांचा फलक काढून टाकण्यात आला.

पुणे-सोलापूर महामार्गावर लोणी काळभोर परिसरात इराणचा ध्वज आणि खामेनी यांचे छायाचित्र असलेले फलक लावण्यात आले होते. याबाबतची चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित झाली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित फलक आणि ध्वज काढून टाकला. ध्वज आणि फलक लावणाऱ्यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

हे फलक लोणी काळभोर ग्रामपंचायतीची परवानगी न घेता लावण्यात आले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीकडून संबंधितांना नोटीस बजाविण्यात आली आहे. पोलिसांकडून याप्रकरणाची चौकशी करण्यात आली. तेव्हा मुस्लीम बांधवांच्या मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर हे फलक एका वस्तीजवळ लावण्यात आले होते. याप्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दिली.

## आंबेडकर भवनाच्या विस्तारीकरणाची मागणी

### जागेसाठी विधिमंडळावर मोर्चा काढण्याचा इशारा

**पुणे** : मालधक्का चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारीकरणासाठी ससून रुग्णालयासमोरील जागा मिळावी, या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण कृती समितीच्या वतीने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यानंतरही हा प्रश्न न सुटल्यास १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर 'जवाब दो' आंदोलन करण्याचा इशारा सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण कृती समितीच्या वतीने माजी आमदार जयदेव गायकवाड, अविनाश साळवे, रोहिदास गायकवाड, वसंत साळवे, अरविंद तायडे आणि परशुराम वाडेकर यांनी या आंदोलनाची माहिती दिली.

गायकवाड म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनालगतची जागा विस्तारीकरणासाठी देण्याचा ठराव २० जुलै २००० रोजी पुणे महापालिकेची स्थायी समिती व मुख्य सभेने बहुमताने मंजूर केला होता. मात्र, ४ सप्टेंबर २०२४ पासून खासगी व्यावसायिकाला ६० वर्षांच्या भाडेकरारावर ही जागा देण्याचा बेकायदा करार केला आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत एखादा ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यास त्याची तत्काळ अंमलबजावणी होण्याऐवजी नियम धाब्यावर बसवून कायद्याची पायमल्ली करत घाईगडबडीने हा भूखंड खासगी कंपनीला देण्याचा निर्णय घेतला. पक्ष व राजकारण बाजूला ठेवून आंबेडकरी जनतेच्या अस्मितेचा विषय असलेली ही जागा खासगी कंपनीला देऊ नये, अशी मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी केली आहे.'

## विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या अल्पवयीन मुलीवर दौंडमध्ये बलात्कार

**दौंड** : पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून पंढरपूरला देवर्शनासाठी निघालेल्या आणि चहा पिण्यासाठी थांबलेल्या कुटुंबातील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञातांपैकी एकाने अल्पवयीन मुलीच्या गळ्याला कोयता लावून तिच्यावर बलात्कार केला. तसंच इतर महिलांच्या गळ्यातील दीड लाखांच्या आसपास सोन्या चांदीचे दागिने लुटून दरोडेखोर पसार झाल्याची ही घटना आहे.

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून चार चाकी गाडीतून एक कुटुंब पंढरपूरला देवदर्शनसाठी जात होतं. सोमवारी (दि.३० जून) पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या स्वामी चिंचोली येथे महामार्गाच्याजवळ असलेल्या एका टपरी जवळ चार चाकी वाहनातून काही महिला व पुरुष उतरले. ते या ठिकाणी चहा पिण्यासाठी थांबले होते. त्याचवेळी दोन अज्ञात इसम या ठिकाणी दुचाकीवरून आले. त्यांनी कोयत्याचा धाक दाखवून, डोळ्यांमध्ये लाल रंगाची चटणी टाकून महिलांच्या गळ्यातील १ लाख ५० हजाराचे दागिने लुटले आणि त्यातील एकाने एका अल्पवयीन मुलीला टपरीच्या पाठीमागे असलेल्या नाल्या शेजारील झुडुपांमध्ये अंधारात फरपटत नेलं आणि तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. 'द हिंदू'ने हे वृत्त दिलं आहे.

चहासाठी थांबलेल्या वारकऱ्यांच्या गळ्याला कोयता लावून लूटमार करण्याची आणि वारकऱ्यांसह असलेल्या अल्पवयीन मुलीवर अज्ञात गुंडांनी अत्याचार केल्याची दौंडमध्ये घडलेली घटना ही महाराष्ट्राला काळीमा फासणारी आहे. राज्यात कुठलीही कायदा व सुव्यवस्था राहिली नसून गुंडांना कशाचाही धाक उरलेला नाही. आज वारकरीही सुरक्षित नसतील तर महाराष्ट्रात जंगलराजच सुरू आहे, असंच म्हणावं लागेल. गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याऐवजी केवळ गप्पा हाणणारे गृहमंत्री कधी जागे होतील? काल कर्जत-जामखेड तर आज दौंड दररोजच कुठं ना कुठं अत्याचाऱ्याचा घटना घडत आहेत, पण सरकार लक्ष द्यायला तयार नाही, हे दुर्दैव आहे. अशी पोस्ट रोहीत पवार यांनी केली आहे.

दरम्यान लूटमार आणि बलात्काराच्या या घटनेने दौंड तालुक्यासह जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अज्ञात संशयित आरोपींचा शोध घेत आहेत. दरम्यान, घटनास्थळी बारामती विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार , दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस, पुणे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधीक्षक अविनाश शिळीमकर , पोलीस निरीक्षक गोपाळ पवार , नारायण देशमुख आदींनी घटनास्थळी भेट देऊन परिसराची पाहणी केली. दरम्यान या प्रकरणावरुन रोहीत पवार यांनी राज्य सरकारवर टीका केली.

### लोणावळ्यात पावसाची बॅटिंग सुरूच

**लोणावळा** : लोणावळ्यात यावर्षी जून च्या अखेरीस पर्यंत पावसाने तुफान बॅटिंग केली आहे. गेल्या वर्षीच्या तुनलेत यावर्षी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. चालू वर्षात आत्तापर्यंत १ हजार ९९८ मिलिमीटर पाऊस कोसळला आहे. जो गेल्या वर्षीच्या तुलनेत खूप अधिक आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवसापर्यंत केवळ ६६२ मिलिमीटर पाऊस झाला होता.

यावर्षी मात्र पावसाने मे महिन्यात च हजेरी लावल्याने गेल्या वर्षीचे सर्व रेकॉर्डब्रेक होतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या २४ तासात देखील ७७ मिलिमीटर पाऊस झाला आहे. लोणावळ्यात दररोज पाऊस कोसळत आहे. पावसाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक लोणावळ्यात दाखल होत आहेत. शनिवार, रविवार विकेंड ला पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. भुशी धरण, लायन्स पॉईंट, टायगर पॉईंट पर्यटकांनी गजबजून जात आहे. काही पर्यटनस्थळी प्रतिबंध असला तरी याकडे पर्यटक पाठ फिरवून थेट पर्यटनस्थळे गाठत आहेत.

## वाकड, पुनावळेतील सेवा रस्त्यावरील खड्डे बुजवा

■ **पिंपरी महापालिकेचे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पत्र**

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या पुणे-बंगळुरू (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण महामार्गाला जोडून असलेल्या रावेत, किवळे हद्दीतील सेवा रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. याबाबत महापालिकेकडे तक्रारी येत आहेत. हे खड्डे तातडीने बुजवावेत. तसेच बंद असलेले सात नळकांडी (पाईप कल्व्हर्ट) पुलाची दुरुस्ती करण्याचे पत्र पिंपरी-चिंचवड महापालिकेने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले आहे.

पुणे-बंगळुरू महामार्ग पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतून जातो. महामार्गालगत असलेल्या किवळे, रावेत, वाकड, पुनावळे, ताथवडे येथील सेवा रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. सेवा रस्त्यावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या आखत्यारित असलेल्या दहा नळकांडी पुलांपैकी केवळ दोन पूल नैसर्गिक नाल्यावर आहेत. बाकीचे पूल जागेच्या समानतेनुसार केले आहेत. तेथे नैसर्गिक नाला असल्याची विकास आराखड्यात कोठेही नोंद नाही. सात पूल मातीने भरले आहेत. त्यामुळे महामार्गाच्या पश्चिमेकडील बाजूकडील पाणी पूर्वेकडे वाहून जात नाही. परिणामी, पाणी साचून राहते. त्यासाठी पूल साफ करावेत. त्यानंतर पाणी साचणार नाही. सेवा रस्त्यावर पावसाळी पाण्याची वाहिनी नाही. त्यामुळे पावसाचे पाणी नाल्यापर्यंत जात नाही. सेवा रस्त्यांच्या बाजूस पावसाळी पाण्याची वाहिनी टाकावी. नैसर्गिक नाल्यात पाणी सोडावे. बंद असलेल्या सात नळकांडी पुलाची दुरुस्ती करावी. सेवा रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडतात. गेल्या कित्येक दिवसांपासून रस्त्यावर खड्डे तयार झाले आहेत. रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे आहेत. त्यामुळे महापालिकेकडे बऱ्याच तक्रारी येत आहेत. हे खड्डे बुजवावेत, असे पत्र महापालिकेने प्राधिकरणाला दिले आहे.

## तुळशीबागेत महिलेची पर्स हिसकाविली

**पुणे** : तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेची पर्स चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. पर्समध्ये दहा हजारांची रोकड, दागिने असा ७० हजारांचा ऐवज होता.

याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोंढवा परिसरातील उंड्री भागात राहायला आहे. महिला नातेवाईकांसोबत शनिवारी (२८ जून) खरेदीसाठी आली होती.

दुपारी बाराच्या सुमारास महिला तुळशीबागेतील कावेरे कोल्ड्रीग दुकानासमोरील बोळातून निघाली होती. त्या वेळी गर्दीत चोरट्याने महिलेकडील पर्स हिसकावून नेली. महिलेने आरडाओरडा केला. चोरटा गर्दीतून पसार झाला. तुळशीबागेतील विक्रेत्यांनी चोरट्याचा पाठलाग केला. त्यानंतर महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलीस कर्मचारी सुरवसे तपास करत आहेत.

## तोट्यातील मार्गांवरील बस बंद; उत्पन्नवाढीसाठी 'एसटी'च्या पुणे विभागाचे फेरनियोजन

**पुणे** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागाकडून बसचे फेरनियोजन केले जाणार असून, कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांवरील सेवा बंद केली जाणार आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडण्यात येणार असून, जुन्या बस सेवेतून काढून येत्या वर्षअखेरपर्यंत १५० नवीन बस ताफ्यात दाखल होणार आहेत. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी 'एसटी' महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने फेरनियोजनाचे काम हाती घेतले आहे. पुणे विभागांतर्गत शहर आणि जिल्ह्यात १४ आगार आणि ४२ स्थानके असून, ८५० बस आहेत. यांपैकी ६४ इलेक्ट्रिक (शिवाई), ३६ व्होल्व्हो लक्झरी (शिवशाही) आणि २०० सीएनजी बस आहेत.

'कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांची माहिती संकलित करण्यात येत आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडल्या जाणार आहेत. याबाबतचे नियोजन करण्यात येत आहे. जास्त उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांवर अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. याबाबत नवीन वेळापत्रक तयार केले जाणार आहे,' असे एसटी महामंडळाच्या पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितले.

ते म्हणाले, 'सध्या ७० नवीन बस विविध आगारांतून लांब पल्ल्यांच्या ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे. येत्या वर्षअखेरपर्यंत सुमारे १५० बस ताफ्यात दाखल होणार आहेत. प्रमुख स्थानके आणि आगार या ठिकाणी होणारा देखभाल-दुरुस्ती खर्च, चालक-वाहक यांच्या वेळा आणि वेतन खर्च, सुरक्षिततेच्या अनुषंगाने उपाययोजना, सण आणि सुट्यांच्या कालावधीत प्रवासी संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन जादा फेऱ्यांचे नियोजन करण्यात येत ओह. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल.'

# संपादकीय

## सरकारची माघार !

इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध झाल्यानंतर राज्य सरकारने हा निर्णय रद्द करण्यात आल्याची घोषणा केली. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच सरकारने त्रिभाषा सूत्रासंदर्भातील शासन निर्णय रद्द केल्याचे सांगितले. सरकारने हा निर्णय रद्द केल्यानंतर त्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिल्या. दोन्ही नेत्यांनी ५ जुलै रोजी एकत्र मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. राज्य सरकारने त्रिभाषा सूत्रासंदर्भातील शासन निर्णय रद्द केल्यानंतर उद्धव ठाकरे म्हणाले, मराठी माणसाच्या शक्तीसमोर सरकारची शक्ती-सक्ती हरली आहे. मराठी माणसाने ताकद दाखवली तर सरकारदेखील मागे हटते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यावेळीही असेच घडले होते. त्या वेळी सर्व नेते पक्षभेद विसरून एकत्र आल्याने तेव्हा डाव उधळला होता. आताही तो डाव उधळला आहे. ५ तारखेचा मोर्चा होऊ नये म्हणून जीआर रद्द केला. राज ठाकरे यांनी सरकारला उशिरा सुचलेले शहाणपण, असे म्हटले आहे. इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला गेला. सरकारने या संबंधातील दोन जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही कारण ही सक्ती फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता? हे मात्र अजून गूढच आहे. महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावीच म्हणून तीन भाषा लादण्याचा जो प्रयत्न होता तो एकदाचा हाणून पाडला गेला यासाठी महाराष्ट्रातील तमाम जनतेचं अभिनंदन. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिल २०२५ पासून या विषयावर आवाज उठवला होता आणि तेव्हापासून हा मुद्दा तापायला लागला. त्यानंतर एक एक राजकीय पक्ष आवाज उठवायला लागले. मनसेने पक्षविरहित मोर्चा काढायचा ठरवल्यावर अनेक राजकीय पक्षांनी, संघटनांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. हा मोर्चा जर झाला असता तर इतका विशाल झाला असता की, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळाची आठवण झाली असती. कदाचित या एकजुटीचा धसका सरकारने घेतला असेल; पण हरकत नाही अशी भीती असली पाहिजे. सरकारने पुन्हा एकदा नवीन समिती नेमली आहे. समितीचा अहवाल काहीही येवो; परंतु हे असले प्रकार परत खपवून घेतले जाणार नाहीत. सरकारने ही गोष्ट कायमची मनात कोरून ठेवावी. हा निर्णय कायमचा रद्द झाला आहे, असे आम्ही आणि महाराष्ट्रातील जनतेने गृहीत धरले आहे. यामुळे पुन्हा एकदा समितीच्या अहवालाचा घोळ घालू नका अन्यथा या समितीला महाराष्ट्रात काम करू दिलं जाणार नाही याची नोंद सरकारने घ्यावी, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला. आता मराठी माणसाने पण यातून बोध घ्यायला हवा. तुमच्या अस्तित्वाला, तुमच्या भाषेला नख लावायला आपलेच लोक बसलेत. त्यांच्यासाठी ते ज्या भाषेत शिकले, वाढले, जी भाषा त्यांची ओळख आहे त्याच्याशी त्यांना काही देणं-घेणं नाही. त्यांना कोणालातरी खुश करायचे आहे, असे दिसते. या वेळी मराठी मनांचा एकत्रित राग दिसला, तो पुन्हा पुन्हा दिसला पाहिजे. भाषेसाठी मराठी माणसं एकवटताना दिसली याचा आनंद आहे. हा कडवटपणा अधिक वृद्धिंगत झाला पाहिजे. मराठी भाषा ज्ञानाची आणि जागतिक व्यवहाराची व्हावी हीच इच्छा. मराठी जनांचं पुन्हा एकदा अभिनंदन, असे राज म्हणाले. महाराष्ट्र सरकारने राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्यासंदर्भात नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अहवालानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे. सरकारच्या माघारीनंतर उबाठा आणि मनसेने जल्लोष केला. आता ५ जुलै रोजी विजयी मोर्चा किंवा सभा घेणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याची चर्चा झाली. त्यानंतर पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंदीबाबत नव्या धोरणाची माहिती दिली. मुख्यमंत्री म्हणाले, २१ सप्टेंबर २०१० रोजी तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कसे राबवायचे, यासाठी समिती नेमली होती. १६ ऑक्टोबर २०२० रोजी जीआर निघाला. नामवंत शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ तज्ज्ञांची समिती बनवण्यात आली होती. समितीने १०१ पानांचा अहवाल दिला होता. अहवालात म्हटले होते की, इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिलीपासून बारावीपर्यंत शिकवावी. हा अहवाल उद्धव ठाकरे सरकारला सादर करण्यात आला होता. अहवाल स्वीकारताना त्रिभाषा सूत्र बाजूला ठेवा, आम्हाला ते मान्य नाही, असे काहीच म्हटले नव्हते. उद्धव ठाकरे सरकारने अहवाल स्वीकारला, मान्यता दिली फक्त अंमलबजावणी बाकी होती. आमच्या काळात जे जीआर निघाले आहेत ते याच अहवालावर निघाले. १६ एप्रिल रोजी आम्ही पहिला जीआर काढला. त्यात म्हटले होते की, मराठी भाषा सक्तीची, दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी भाषा हिंदी असेल. यावर अनेकांनी प्रश्न उपस्थित केल्याने १७ जून रोजी आम्ही हा निर्णय बदलला. तिसरी भाषा म्हणून कोणतीही भारतीय भाषा शिकता येईल, असा नवा जीआर काढला शिवाय तिसरी भाषा पहिलीपासून नाही. सक्तीची केलेल्या हिंदीवर पर्याय देण्याचे काम आमच्या सरकारने केले. राज्यात त्रिभाषा सूत्र लागू न केल्यास मराठी मुले मागे पडतील, इतर भाषेच्या विद्यार्थ्यांना गुण जास्त मिळतील, असे आमचे म्हणणे होते. या मुद्यावरून आम्हाला राजकारण करायचे नाही. त्रिभाषा सूत्र कुठल्या वर्गापासून लागू करावे, कसे लागू करावे, काय पर्याय द्यावा या संदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक समिती स्थापण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. समितीत इतरही काही सदस्य असतील. या समितीच्या आधारेच त्रिभाषा सूत्र लागू केले जाईल. आम्ही दोन्ही शासन निर्णय रद्द करत आहोत. नरेंद्र जाधव समिती माशेलकर समितीचा अभ्यास करेल, विरोधातील सर्वांचे म्हणणे ऐकून घेईल आणि नंतरच राज्य सरकार निर्णय स्वीकारेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यांनी म्हटले आहे. नरेंद्र जाधव हे अर्थतज्ज्ञ आहेत. हिंदी भाषा जगवावी कशी अशा विषयांशी विषयतज्ज्ञ म्हणून त्यांचा काहीही संबंध नाही तरीही त्यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली ती कशासाठी? असा सवाल केला जात आहे.

## अघोषित आणीबाणीही नकोच!

काँग्रेस आजही ५० वर्षांपूर्वीच्या आणीबाणीच्या काळातील हुकूमशाही मानसिकतेत आहे. जेव्हा सत्ताधारी हुकूमशहा होतात तेव्हा जनता त्यांना उखडून फेकते हे काँग्रेसने लक्षात ठेवावे अशी टीका भाजपने केली आहे. आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला बुधवारी ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भाजपकडून हा दिवस संविधान हत्या दिन म्हणून पाळण्यात आला. यानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेस पक्ष आणि गांधी कुटुंबियांना लक्ष्य केले. आणीबाणी लागू करणे ही देशाची गरज नव्हती तर काँग्रेस पक्ष आणि एका व्यक्तीच्या लोकशाहीविरोधी मानसिकतेचे द्योतक होते. देशावर राज्य करण्याचा अधिकार केवळ एका कुटुंबाकडेच आहे. याच हुकूमशाही मानसिकतेतून ५० वर्षांपूर्वी आणीबाणी लादण्यात आली. आजही काँग्रेस त्याच मानसिकतेत आहे, अशी टीका अमित शहा यांनी केली.

काँग्रेसने आणीबाणी लादल्याबद्दल आजपर्यंत देशाची माफी मागितली नाही. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या आडून घटनादुरुस्ती करून राज्यघटनेचा आत्मा विकृत केला, अशी टीका भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केली. २५ जून १९७५ या देशातील एका काळ्याकुट्ट अध्यायाला ५० वर्षे झाली. त्याला सुवर्णमहोत्सव म्हणायचे तरी कसे? महोत्सव हा चांगल्याचा करायचा असतो. त्यामुळे संविधान आणि संविधानिक व्यवस्था आणि लोकशाही पायदळी तुडवणा-या काँग्रेस पक्षाने लिहिलेल्या या अध्यायाला ५० वर्षे झाली, एवढेच म्हणावे लागेल. जुने दिवस कधी विसरायचे नसतात, ते सतत आपल्याला लढण्याचे बळ देत असतात, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. भाजपच्या आरोपांना काँग्रेसनेही सडेतोड उत्तर दिले आहे. भाजपने लादलेल्या आणीबाणीवर तोंडसुख घेतले आहे. परंतु आज ११ वर्षांपासून सुरू असलेल्या अघोषित आणीबाणीचे काय असा सवाल काँग्रेसने केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे राज्यघटना संकटात आहे. देशात गत ११ वर्षांपासून अघोषित आणीबाणी आहे असा पलटवार काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. मोदी सरकार महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, नोटबंदी, काळा पैसा अशा प्रत्येक मुद्यावर अपयशी ठरले आहे.

सरकारचे हे अपयश लपवण्यासाठी भाजपकडून संविधान हत्या दिन पाळण्यात आला. आज हे राज्यघटना वाचवण्याबद्दल बोलतात. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच राज्यघटना संकटात सापडली आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनात, राज्यघटनेच्या निर्मितीत ज्यांचे काहीच योगदान नव्हते, त्यांना आज राज्यघटनेचा कळवळा आला आहे. 'ती' आणीबाणी २१ महिन्यांत संपुष्टात तरी आली. परंतु गत ११ वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी लागू आहे त्याचे काय? काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी मोदी सरकार राज्यघटनेची पायमल्ली करत असल्याचा आरोप केला. आज राजकीय विरोधकांना चिरडण्यासाठी ईडी, सीबीआयसारख्या तपास यंत्रणांचा दुरुपयोग करण्यात येत आहे. संसदीय परंपरांचे पालन केले जात नाही. न्यायपालिकेला कमकुवत करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर व विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गत ११ वर्षांपासून भारतीय लोकशाहीवर पाच दिशांनी संघटित व सुनियोजित पद्धतीने हल्ले करण्यात येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना बदलण्यासाठीच 'चारशेपार'चे बहुमत मागण्यात आले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपले परखड मत व्यक्त करताना घोषित-अघोषित आणीबाणीत फरक करण्याची वेळ आल्याचे म्हटले आहे. देशात आणीबाणी लावल्याच्या घटनेला ५० वर्षे झाली. या पार्श्वभूमीवर भाजप देशभरात या आणीबाणीला विरोध दर्शवित काँग्रेसवर टीका करीत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणीबाणीविरोधात प्रस्तावही मंजूर करण्यात आला. या मुद्यावरून शरद पवार यांनी आता घोषित-अघोषित आणीबाणीत फरक करण्याची वेळ आली असून पुन्हा सावध राहण्याचा काळ आला आहे असा टोला सत्ताधारी भाजपला लगावला. कामगार संघटनेच्या एका मेळाव्यात बोलताना शरद पवार म्हणाले, वृत्तपत्रात काम करणा-यांना घोषित-अघोषित आणीबाणीची माहिती असेल. एखादे वृत्तपत्र आपले स्वच्छ मत मांडत असेल आणि ते सरकारच्या विरोधात असेल तर ते वृत्तपत्र आणि पत्रकाराला सरकारच्या मुख्यालयातून फोन येतात. अमुक एक बातमी अशी छापू नका. सरकारविरोधी भूमिका घ्यायची असेल आणि नंतर काही झाले तर आमच्याकडे येऊ नका अशी धमकी दिली जाते. त्यामुळे आता पुन्हा सावध राहण्याची वेळ आली आहे.

आम्ही वाट्टेल ती किंमत देऊ पण संसदीय लोकशाहीचा देश अखंड राहील, हा दृष्टिकोन पुढे ठेवून उभे राहू असे शरद पवार म्हणाले. 'तो' काळच तसा होता. पाकिस्तानचे दोन तुकडे करणा-या इंदिरा गांधी नावाची मोहिनी सा-या देशावर होती. काही जण त्यांना 'आयर्न लेडी' तर कोणी 'दुर्गेचा अवतार' असे गौरवित होते. तेव्हाही देशात कुपोषण, बेरोजगारी, गरिबी होती. इंदिरा गांधींनीच 'गरिबी हटाव'चा नारा दिला होता. देशात सार्वत्रिक असंतोष निर्माण झाला होता. त्यातून बाहेर पडण्यासाठी आणीबाणीचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. आणीबाणीद्वारा काँग्रेस सरकारने जणू काही लोकशाहीलाच कैद करून टाकले होते अशी टीका आज भाजप सरकार करत आहे. भूतकाळात घडलेल्या गोष्टींवरील भाजपची टीका रास्त असेलही परंतु आजचे सत्ताधारी प्रत्यक्षात काय करीत आहेत? वस्तुस्थिती अशी की, सत्ताधा-यांकडून असंयमित, द्वेषपूर्ण वक्तव्ये केली जात आहेत. नागरी स्वातंत्र्यावर गदा आणली जात आहे, स्वायत्त संस्थांना नामोहरम केले जात आहे. विरोधी पक्षांची सरकारे पाडली जात आहेत.

राज्यपालांमार्फत विरोधी पक्षांच्या राज्यकारभारात अनावश्यक हस्तक्षेप केला जात आहे. ईडी, सीबीआय, आयटीसह अन्य तपास यंत्रणांचा वापर राजकीय उद्देशाने केला जात आहे. भाजपवासी झाले तर ईडीमुक्ती अन्यथा घर-कार्यालयांवर छापेसत्र हीच भाजपच्या कारभाराची रीत बनली आहे. भूतकाळातील आणीबाणी दुर्दैवी होती, परंतु इंदिरा गांधी यांनी या कृत्याबद्दल नंतर जनतेची माफीही मागितली होती. त्यामुळे काँग्रेस असो वा भाजप दोघांनाही आणीबाणी नकोच आहे. देशावर पुन्हा आणीबाणी लादण्याची हिंमत कोणीही करणार नाही हे खरे असले तरी या देशावर अघोषित आणीबाणी लादली जाणार नाही असे कोणीही ठामपणे सांगू शकणार नाही. देशातून आणीबाणी मुळासकट हद्दपार करायची असेल तर देशातील भ्रष्टाचार समूळ नष्ट करावयास हवा. संविधानाने दिलेले हक्क लक्षात घेता प्रत्येकाच्या मतांचा आदर करायला हवा.

## शुभांशूची अवकाश भरारी!

भारतीय वायुदलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी बुधवारी दुपारी १२ वाजून एक मिनिटाने 'नासा'च्या फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून 'ऑक्सिऑम-४' या अंतराळ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले. नासाचे 'फॉल्कन-९' हे यान अंतराळवीरांना घेऊन अवकाशात झेपावले. शुभांशूबरोबर या मोहिमेत आणखी तीन अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाकडे रवाना झाले आहेत. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी बुधवारी यशस्वीरीत्या अवकाशात झेप घेत इतिहास रचला आहे. भारताच्या राकेश शर्मा यांच्या अवकाश प्रवासानंतर ४१ वर्षांनी ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी अवकाशात झेप घेतली. अनेक तांत्रिक अडचणींवर मात करत, भारतीय वेळेनुसार बुधवारी दुपारी १२ वाजून एक मिनिटाने स्पेस एक्सच्या फाल्कन-९ रॉकेटने ड्रॅगन अंतराळयानासह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे उड्डाण केले. 'ऑक्सिऑम-४' मोहिमेअंतर्गत अन्य तीन अंतराळवीरांबरोबर शुभांशू शुक्ला यांनी अवकाशात उड्डाण केले.

यापूर्वी ३ एप्रिल १९८४ रोजी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे सोव्हिएत संघाच्या मदतीने अवकाश मोहिमेवर गेले होते. तब्बल ४१ वर्षांनंतर पुन्हा एकदा भारतीय अंतराळवीर अवकाशात झेपावला आहे. शुभांशू शुक्ला हे मूळचे लखनौचे रहिवासी असून एक वर्षाच्या प्रशिक्षण व कठोर मेहनतीनंतर त्यांची 'नासा'ने या मोहिमेसाठी निवड केली आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील ही चौथी खासगी अंतराळवीर मोहीम आहे. अंतराळवीर एका नवीन स्पेस एक्स ड्रॅगन अंतराळयानातून प्रवास करत आहेत. अंतराळवीर १४ दिवस प्रयोगशाळेत राहणार आहेत. नासाच्या माजी अंतराळवीर आणि 'ऑक्सिऑम स्पेस'चे मानवी अंतराळ उड्डाण संचालक पेगी व्हिटसन, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला, पोलंडचे स्लावोझ उझनान्स्की आणि हंगेरीचे टिबर कापू हे अंतराळवीर आहेत. भारत १९८४ नंतर, पोलंड १९७८ नंतर तर हंगेरी १९८० नंतर पुन्हा अवकाशात गेले आहेत.

'ऑक्सिऑम स्पेस'च्या व्यावसायिक मोहिमेअंतर्गत हे उड्डाण होत आहे. उड्डाणानंतर १० मिनिटांनी अंतराळवीर पृथ्वीभोवतीच्या कक्षेत फिरू लागले. कक्षेत स्थिर झाल्यानंतर अंतराळवीरांनी त्यांच्या अवकाशकुपीचे 'ग्रेस' नाव जाहीर केले. शुक्ला यांनी अवकाशात ४१ वर्षांनी भारतीय पुन्हा पोहोचल्याची घोषणा केली. हा प्रवास १.४ अब्ज भारतीयांचा आहे असे ते म्हणाले. अवकाश स्थानकावरील मुक्कामात शुभांशू शुक्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची शक्यता आहे. पृथ्वीपासून २०० किमी अंतरावरील कक्षेत पोहोचल्यानंतर शुक्ला म्हणाले, मला या क्षणी काहीही म्हणायचे नाही, मी फार आनंदी आहे. आम्ही सेकंदाला ७.५ किमी वेगाने पृथ्वीभोवती कक्षेत फिरत आहोत. माझ्या खांद्यावर असलेला भारताचा तिरंगा मला सांगतो की, तुम्ही एकटे नाहीत, या प्रवासात सर्व भारतीय तुमच्याबरोबर आहेत. ही केवळ माझ्या एकट्याच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील प्रवासाची सुरुवात नसून भारताच्या अवकाश कार्यक्रमाची सुरुवात आहे. देशातील सर्व नागरिकांनी या प्रवासाचा भाग व्हावे, ही माझी इच्छा.

पत्नीसाठी खास संदेश देताना शुक्ला म्हणाले, आयुष्याच्या प्रवासातील माझी अद्भूत भागीदार असलेल्या कामना शुक्लाचे विशेष आभार. तुझ्याशिवाय हे काहीच शक्य नव्हते आणि तू नसतीस तर या कशालाच किंमत नसती. आमच्यापैकी कोणीही एकट्याने अंतराळात प्रवास करत नाही. अनेकांच्या भरवशावर आम्ही हे करू शकतो. मी प्रत्येकाचा आभारी आहे.

शुक्ला आणि त्यांचे सहकारी १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहणार आहेत. या काळात ते अनेक महत्त्वपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भाग घेतील. 'इस्रो'ने खास शुक्ला यांच्यासाठी तयार केलेले सात प्रयोग ते करणार आहेत. ज्यामध्ये सूक्ष्म-गुरुत्वाकर्षणाच्या स्थितीत मेथी आणि मुगाला अंकुरित करण्यासारख्या प्रयोगांचा समावेश आहे. याशिवाय ते नासाच्या पाच संयुक्त अभ्यासामध्येही सहभागी होतील. ड्रॅगन अंतराळयान सुमारे २८ तासांनंतर गुरुवारी (२६ जून) दुपारी साडेचार वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला (आयएसएस) जोडले जाईल. अवकाशयान एका दिवसात पृथ्वीला १६ वेळा प्रदक्षिणा घालेल. शुभांशू १४ दिवस आयएसएसवर राहतील. या काळात ते अंतराळात मानवी आरोग्यावर आणि जीवावर होणारे परिणाम तपासणे यासारखे सात प्रयोग करतील.

दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करतील. शुभांशू यांनी आपल्यासोबत आंब्याचा रस, गाजराचा हलवा आणि मूगडाळीचा हलवा नेला आहे म्हणे. शुक्ला यांचे अंतराळयान अवकाशात झेपावल्यानंतर त्यांच्या आई आशा शुक्ला यांचे डोळे पाणावले. त्यांनी मुलाच्या सुखरूप प्रवासासाठी हात जोडले. 'ऑक्सिऑम मिशन-४' वरील शुक्ला यांच्या अनुभवाचा 'इस्रो'च्या गगनयान मोहिमेला चांगला फायदा होणार आहे. इस्रो 'ऑक्सिऑम-४' मोहिमेवर साडेपाचशे कोटी रुपये खर्च करत आहे. अलिकडे भारताने अवकाश क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. चांद्रयान-३ आणि आदित्य एल-वन मिशनच्या यशानंतर इस्रोने लहानसहान उपग्रह सोडण्यासाठी 'एसएसएलव्ही-डी-३'ची तीनदा यशस्वी चाचणी घेतली. या माध्यमातून उपग्रह प्रक्षेपण उद्योगात भारताने स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. भारताचे खरे लक्ष्य गगनयान मोहीम आहे. या मोहिमेद्वारे भारत स्वत:च्या बळावर चार अंतराळवीरांना अवकाशात पाठवणार आहे. त्यासाठी शुभांशू शुक्लाचा अनुभव लाख मोलाचा ठरणार आहे. शुभांशू शुभ भव!

**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).**
**संपादक : शिवाजी बबन खेडकर**

## एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस उपाययोजना आवश्यक

**मुंबई :** राज्यातील एकल महिलांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करत विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे राज्य निमंत्रक श्री. हेरंब कुलकर्णी यांनी एकल महिलांच्या सविस्तर समस्या मांडल्या.

यावेळी अपर मुख्य सचिव, श्रीमती व्ही. राधा, महिला व बालविकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे, निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, दिल्ली श्रीमती विमला, आदिवासी विकास सहसचिव श्री. मच्छिंद्र शेळके, रोजगार हमी योजना सहसचिव श्री अतुल कोदे, उपायुक्त महिला व बाल विकास श्री राहुल मोरे व साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

राज्यातील अनेक महिलांना पतीच्या निधनानंतर, विभक्त झाल्यावर किंवा पतीने सोडून दिल्यानंतर एकल जीवन जगावे लागत आहे. या महिलांना केवळ सामाजिकच नव्हे तर आर्थिक, शारीरिक आणि कायदेशीर पातळीवरही अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महिलांच्या मालमत्तेवर अधिकार, शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगार व सुरक्षा यांसारख्या मूलभूत गरजांबाबत बैठक चर्चेचे केंद्र ठरली.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, एकल महिलांची संख्या राज्यात मोठ्या प्रमाणावर असून, २०११ च्या जनगणनेनुसार ही संख्या ५४ लाखांवर आहे. त्यामुळे एकल महिलांसाठी स्वतंत्र कार्यक्रम तयार करणे अत्यावश्यक झाले आहे. त्यांच्यावर होणाऱ्या शोषणाला आळा घालण्यासाठी त्यांच्या नोंदणी करून कार्यवाही करणे गरजेचे आहे यामुळे त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सहज मिळवता येईल.

कोविड काळात महिलांच्या अडचणी अधिक तीव्र झाल्या होत्या. त्या काळात केलेल्या निवेदनांच्या आधारे काही विभागांनी सकारात्मक पावले उचलली. आता एकल महिलांच्या संदर्भात अधिक संगठित आणि प्रभावी उपाययोजना करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा किंवा जनगणना यंत्रणेमार्फत एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याची शक्यता तपासण्यात येणार आहे. महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा, रोजगार हमी, संजय गांधी निराधार यांसारख्या योजनांमधील डेटा एकत्र करून एकल महिलांची निश्चित यादी तयार करणे हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. याशिवाय, एकल महिलांना कौशल्यविकास प्रशिक्षण, स्वयंरोजगार योजनांतून प्राधान्याने कर्ज, माहितीच्या आधारे पोलीस स्टेशनमार्फत सुरक्षा व वैद्यकीय उपचार सुविधा देणे यावरही भर दिला जाणार आहे. महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेचे जबरदस्तीने हस्तांतरण होऊ नये म्हणून पोलीस अहवाल घेऊनच दस्त नोंदणी प्रक्रिया पार पडावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

# सारथी संस्थेच्या कामाला निधी कमी पडू दिला जाणार नाही- उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **सारथीच्या युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार**

**पुणे :** सारथी संस्थेच्या कामाला गती देण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत असून त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. ही संस्था नवीन असून या संस्थेच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होण्यासाठी सारथीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी येणाऱ्या काळात सामाजिक जबाबदारी म्हणून नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास सारथीचे संचालक उमाकांत दांगट, मधुकर कोकाटे, डॉ. नवनाथ पालकर, किशोरराजे निंबाळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिवाजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. श्री. पवार पुढे म्हणाले, युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रशासनात काम करताना लोकाभिमूख काम करुन, समाजातील दुर्बल व वंचित घटकांना मदत करावी. या कामात सातत्य ठेऊन संस्थेचा नावलौकीक वाढवा. सारथी ही संस्था राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने कार्यरत असून, त्यांच्या नावाला साजेसे असे काम उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराने संस्थेची वाटचाल सुरू असून संस्थेचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे. संस्थेच्या माध्यमातून आपणास जे यश मिळाले आहे, त्या यशाचे अनुभव इतरांना सांगून, सारथीच्या माध्यमातून पुढील विद्यार्थ्यांना समर्पक भावनेतून मदत करावी, असे आवाहन श्री. पवार यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य क्रांतीकारी असून ते विसरता येणार नाही. देशात अशा प्रकारची एकही सामाजिक संस्था नाही, जिच्या उद्दिष्टांमध्ये छत्रपती शाहू महाराजांचा विचार नाही.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथे जिप्सी सफारी उपक्रमाचे उद्घाटन

**पुणे :** राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथील गवताळ प्रदेशामध्ये जिप्सीमधून करण्यात येणाऱ्या सफारी उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नागरिकांनी या सफारीचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी वनसंरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक महादेव मोहिते,सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे, इंदापुरच्या वनपरिक्षेत्र अधिकारी भाग्यश्री ठाकूर आदी उपस्थित होते.

श्री. भरणे यांच्या हस्ते पुणे वनविभागाकडून एकूण ३ जिप्सीधारकांना प्रत्येकी १ लाख रुपयाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले तसेच कडबनवाडी गवताळ प्रदेशाच्या लोगोचे अनावरणही करण्यात आले.

श्री. भरणे यांनी कडबनवाडी येथील गवताळ प्रदेशाची स्वतः सफारी केली. नागरिकांनीही या सफारीचा आनंद घेऊन याबाबत इतर नागरिकांपर्यंत माहिती पोहचवावी, असे आवाहन श्री. भरणे यांनी केले.

यावेळी कडबनवाडी वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जलभूषण भजनदास पवार, सदस्य दादासाहेब जाधव, सरपंच संगिता गावडे, उपसरपंच कडबनवाडी, ॲड. सचिन राउत, फ्रेंडस ऑफ नेचर क्लब, निमगाव केतकी व त्यांचे सदस्य आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

### रस्ते, मेट्रो, सिंचनासारख्या पायाभूत प्रकल्पांची निर्मिती, कुंभमेळ्याचे नियोजन

**मुंबई :** विधीमंडळाच्या जून २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने राज्यात रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी, महात्मा ज्योतीराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी ८५ लाख रुपये अनिवार्य तर ३४ हजार ६६१ कोटी ३४ लाख रुपये कार्यक्रमांतर्गत आणि ३ हजार ६६४ कोटी ५२ लाख रुपये केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्या आहेत. स्थूल पुरवणी मागण्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ४० हजार ६४४ कोटी ६९ लाख रुपयांचा आहे.

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज सादर केलेल्या ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक ११ हजार ४२ कोटी ७६ लाख रुपये हे पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अनुदानांसाठी खर्च होणार आहेत.

## 'संवादवारी'च्या प्रदर्शनाला सणसर येथे वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे :** डोक्यावर विठ्ठल-रुखमाईची मूर्ती, तुळशी वृंदावन, हातात टाळ, वीणा, भागवत धर्माचा पताका हाती घेत पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे मार्गस्थ वारकऱ्यांची पाऊले माहिती व जनसंपर्क महासंचालनालयच्या 'संवादवारी'कडेही वळत आहेत.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत आयोजित 'संवादवारी' उपक्रमाअंतर्गत प्रदर्शन, चित्ररथ, एलईडी व्हॅन , कलापथक, पथनाट्याच्या माध्यमातून शासकीय योजनांचा जागर सुरू आहे. यापूर्वी कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, यवत, वरवंड, उंडवडी गवळ्याची, बारामती आणि सणसर येथे या उपक्रमाला वारकरी व ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**चित्ररथाचे विशेष आकर्षण**

पालखी सोहळ्यासोबत असलेला चित्ररथही वारकऱ्यांसाठी विशेष आकर्षण आहे. अनेक ठिकाणी वारकरी चित्ररथासोबत छायाचित्र घेताना दिसत आहेत. चित्ररथावर दर्शनी भागावरील लामणदिवा, तुळशी वृंदावनाची प्रतिमा असल्याने वारीसोबत असलेल्या भाविकांची पावले चित्ररथाकडे वळतात.

चित्ररथरथाची रचना आणि त्यावर कलात्मकतेने दिलेली माहिती वारकरी बांधव कुतूहलाने पाहत आहेत. कलापथकाच्या सादरीकरणाला टाळ्या मिळत असून योजनांची माहिती व मनोरंजन अशी सांगड घातली जात आहे.

वारीसोबत चालणाऱ्या एलईडी व्हॅनवरील मोठ्या पडद्यावर दृकश्राव्य चित्रफीतीच्या माध्यमातून योजनांची माहिती दिली जात आहे. लोककला पथकाच्या माध्यमातून ठिकठिकाणी भजन, विठुनामाच्या गजरासोबत रंजक पद्धतीने शासकीय योजनांची माहिती दिली जाते आणि त्यासोबत स्वच्छता आणि आरोग्याचे संदेशही देण्यात येतात.

## उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**पुणे :** सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना सन २०२३-२४ चा पुरस्कार देवून त्यांचा उचित गौरव करण्यासाठी शासनाने सहकार पुरस्कार देण्याचे ठरविले आहे. त्यानुषंगाने पुणे जिल्ह्यातील इच्छुक सहकारी संस्थांनी त्यानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करुन संबंधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था किंवा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दि. २ जुलै ते १८ जुलै, २०२५ या कालावधीत सादर करावेत, असे आवाहन जिल्ह्याचे (ग्रामीण) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, प्रकाश ल. जगताप यांनी केले आहे.

सहकारी संस्थांनी अधिक माहितीसाठी तालुक्याचे सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक अथवा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन श्री. जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## सारथी मध्ये शाहू जयंत्ती उत्साहात साजरी

**पुणे :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंती उत्सवनिमित्त २६ जून रोजी, सारथी संस्थे मार्फत विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. सदानंद मोरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रा. मोरे म्हणाले की, छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा होते. त्यांची नाळ ही जनतेशी जोडलेली होती. जनतेच्या रंजल्या गांजल्या कष्टकरी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सतत झटत राहिले. ते म्हणाले की, शाहू, फुले व आंबेडकर धर्मनिष्ठ होते पण त्यांनी इतर कुठल्याही धर्माचा अनादर केला नाही. शाहू महाराजां विषयी बोलताना ते म्हणाले की, सयाजीराव गायकवाड व शाहू महाराज हे दोन राजे सामाजिक कार्य करत असताना जेव्हा अस्वस्थ होत त्यावेळी ते तुकाराम महाराजांचे अभंग वाचत व यातून प्रेरणा घेत असत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, सारथी संस्था शाहू महाराजांच्या विचारांनी कशी पुढे नेता येईल यादृष्टीने आमची वाटचाल सुरु आहे. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिवाजीराव पाटील यांनी केले.

## प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानात पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता काम करावे-आदिवासी विकास विभागाचे मंत्री डॉ. अशोक वुईके

**पुणे :** आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरीता प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यात येत आहे; शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा नागरिकांना लाभ देवून जिल्ह्यात अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता प्रशासनाचे काम करावे, याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून हे अभियान यशस्वीपणे पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे आदिवासी विकास विभागाचे मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी महान्याय अभियान आणि प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार उमा खापरे, दिलीप वळसे पाटील, सुनील शेळके, बापूसाहेब पठारे, शंकर मांडेकर, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लिना बनसोड, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त गोपीचंद कदम, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगावचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई आदी उपस्थित होते.

डॉ. वुईके म्हणाले, विकसित भारताकरीता आदिवासींचे योगदान विचारात घेता त्यांच्या सशक्तीकरणाकरिता 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' ३० जून पर्यंत राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीकरीता २५ योजना, १७ विभागाच्या माध्यमातून राबविण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानाअंतर्गत पुणे जिल्ह्यातील ९९ गावांची निवड करण्यात आली असून गावातील पात्र नागरिकांना शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता गावनिहाय कृती आराखडा तयार करा. येत्या १५ ऑगस्ट रोजी आयोजित ग्रामसभेत हा कृती आराखडा मंजूर करुन त्यानुसार कार्यवाही करावी. या गावात योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी.

पुणे शहरात आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांकरीता अद्यायवत वस्तीगृह बांधण्याकरीता प्रशासनाने जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. आश्रमशाळेतील पारधी समाजाच्या विद्यार्थ्यांची आधार कार्डाकरीता नोंदणी करावी. आदिवासी बांधवांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांचे हक्क हिरावून घेणार नाही तसेच कातकरी समाजातील मुले शाळेपासून वचिंत राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

## बैठकांवर बैठका; प्रश्न 'जैसे थे'च पुणेकर नागरिक हैराण

**पुणे :** शहरातील प्रश्नांसाठी भाजपच्या केंद्रीय राज्यमंत्र्यांपासून राज्य मंत्रिमंडळातील मंत्री, आमदार आणि राज्यसभा खासदारांपर्यंत अनेकजण पुणे महापालिकेत अधिकाऱ्यांच्या बैठकांवर बैठका घेत असूनही रस्ते, खड्डे, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा अशा कोणत्याच समस्येवर समाधानकारक उत्तर ना प्रशासनाला शोधता आले आहे, ना पुढाऱ्यांना. प्रशासन सत्ताधाऱ्यांनाच जुमानत नसेल, तर तेथे आमची काय दशा, असा प्रश्न आता सामान्य पुणेकरांना पडला आहे. विरोधकांनी यानिमित्ताने भाजपवर निशाणा साधला असून, नागरिकांच्या प्रश्नांची इतकीच काळजी असती, तर भाजप नेत्यांना वारंवार बैठका घेण्याची वेळ आली नसती, अशी टीका केली आहे.

'शहरातील नागरिकांच्या प्रश्नांची सत्ताधारी म्हणून किती जाण आहे, हे केवळ दाखविण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे आणि राज्यसभेच्या सदस्य खासदार मेधा कुलकर्णी महापालिकेत येऊन बैठका घेऊन सूचना देतात. मात्र, प्रत्यक्षात पुणेकरांच्या समस्या सुटतच नाहीत,' अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केली.

ते म्हणाले, 'गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता आहे. तरीही, शहरातील नेत्यांचा आणि पदाधिकाऱ्यांचा महापालिकेवर अंकुश नाही. शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे, पावसाळ्यात तुंबणारी गटारे, रस्त्यांवर लागणारे कचऱ्याचे ढीग अशा प्रश्नांवर महापालिकेत केंद्रीय मंत्र्यांपासून राज्यातील मंत्र्यांना बैठका घ्याव्या लागतात. या बैठकीत हे नेते प्रशासनाला सूचना देतात. मात्र त्यानंतरही परिस्थिती जैसे थे राहते, हे शहरातील भाजपच्या नेत्यांचे अपयश आहे.'

'भाजप नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना नागरिकांच्या प्रश्नांची इतकीच काळजी असती, तर वारंवार भाजप नेत्यांना बैठका घेण्याची वेळ आली नसती. नागरिकांच्या कामासाठी त्यांनी बैठका घेतल्या असत्या, तर पावसाळ्यात रस्त्यांची, पावसाळी गटारांची अशी अवस्था झाली नसती. केंद्रीय राज्यमंत्री म्हणून काम करणारे मुरलीधर मोहोळ यांनी पीएमपीच्या ताफ्यात इलेक्ट्रिक बस का आणल्या नाहीत, केंद्रातून शहरासाठी त्यांनी किती निधी आणला,' असा सवाल त्यांनी केला.

### कारवाईचे काय झाले?

पावसाळा सुरू होण्यापूर्वी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिकेत येऊन पालिका प्रशासनाची बैठक घेतली. त्या वेळी, रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्यास, तसेच घरांमध्ये पाणी शिरल्यास संबधित अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर शहरात झालेल्या पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचून राहिले. पावसामुळे नागरिकांची दाणादाण उडाली. रस्त्यांवर खड्डे पडले, डांबर वाहून गेले. मात्र, कोणावर जबाबदारी निश्चित होऊन कारवाई झाली, याचे उत्तर अजून मिळालेले नाही.

# एसटीच्या आगाऊ आरक्षणात मिळणार १५ टक्के सवलत

**पुणे :** एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या म्हणजेच १५० कि.मी.पेक्षा जास्तच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणा-या पूर्ण तिकीट धारक (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुटीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात १ जुलैपासून करण्यात येत आहे. प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

१ जूनला एस टी च्या ७७ व्या वर्धापन दिन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणा-या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकिटांमध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल, अशी घोषणा केली होती त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे. अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणा-या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

### आषाढी एकादशी व गणपती उत्सवात प्रवाशांना लाभ

आषाढी एकादशीला व गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणा-या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणा-या नियमित बसेसचे आरक्षण प्रवाशांनी केल्यास त्यांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत १ जुलै २०२५ रोजी लागू होत आहे. तथापि जादा बसेससाठी ही सवलत लागू असणार नाही. तसेच गणपती उत्सवासाठी कोकणात जाणा-या चाकरमानी प्रवाशांना आगाऊ आरक्षण केल्यानंतर या तिकिटाचा लाभ घेता येऊ शकतो.

### ई-शिवनेरीच्या प्रवाशांना लाभ

मुंबई-पुणे मार्गावर धावणा-या एसटीच्या प्रतिष्ठित ई-शिवनेरी बसमधील पूर्ण तिकीट काढणा-या प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आगाऊ आरक्षण करणा-या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, public.msrtcors.com या एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा ïïïïl ईï ठशीर्शीरींळेप या मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५ टक्के सवलत प्राप्त करता येऊ शकते.

## सोसायटी स्थपानेसाठी तीन हजार ७०० रुपयांची लाचेची मागणी

■ **दापोडीतील उपनिबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांविरुद्ध 'एसीबी'कडून गुन्हा**

**पुणे :** सोसायटी नोंदणीनंतर उपविधी पुस्तिका (बायलॉज बुकलेट) देण्यासाठी तीन हजार ७०० रुपयांची लाच घेणाऱ्या दापोडीतील उपनिबंधक कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध दापोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी संगीता किरपाले-चौधरी, मुकुंद पवार यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारदार पिंपरी-चिंचवड शहरातील एका सोसायटीत राहायला आहेत. त्यांच्या सोसायटीतील सर्व सदस्यांनी सोसायटी नोंदणीबाबत २५ मार्च रोजी दापोडीतील उपनिबंधक कार्यालयात प्रस्ताव सादर केला होता.

त्या वेळी उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी संगीता किरपाले-चौधरी, मुकुंद पवार यांनी एका सभासदासाठी ७०० रुपये लाच मागितली होती. त्यानुसार १६ सभासदांच्या सोसायटी नोंदणीसाठी ७०० रुपये प्रमाणे ११ हजार २०० रुपयांची लाच मागण्यात आली होती. त्यानंतर साडेसात हजार रुपये अगोदर घेण्यात आले. सोसायटी नोंदणी करुन याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात आले होते, अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. लाचेची संपूर्ण रकम मिळाली नसल्याने तक्रारदाराल उपविधी पुस्तिका देण्यात आली नव्हती. ही पुस्तिका घेण्यासाठी तक्रारदार उपनिबंधक कार्यालयात गेले होते. त्या वेळी अधिकारी किरपाले-चौधरी, पवार यांनी तक्रारदाराकडे तीन हजार ७०० रुपयांची मागणी केली. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी दापोडीतील उपनिबंधक कार्यालयात सापळा लावला.

## सिंहगड रस्ता भागात ट्रकच्या धडकेत महाविद्यालयीन युवतीचा मृत्यू

**पुणे :** भरधाव ट्रकच्या धडकेत महाविद्यालयीन युवतीचा मृत्यू झाल्याची घटना सिंहगड रस्ता भागातील तुकाईनगर परिसरात घडली. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सई श्रीकांत भागवत (वय १९ ,रा. भन्साळी कॅम्पस, तुकाईनगर, वडगाव बुद्रुक, सिंहगड रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या महाविद्यालयीन युवतीचा नावे आहे. याप्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दीपश्री श्रीकांत भागवत (वय ४८) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सई स. प. महाविद्यालयात कला शाखेत द्वितीय वर्षात होती. गुरुवारी (२६ जून) दुपारी ती दुचाकीवरुन घरी निघाली होती. सिंहगड रस्ता भागातील तुकाईनगर परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीस्वार सईला धडक दिली. अपघतात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त अजय परमार, सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांनी घटनास्थळी भेट दिली.

## अभियांत्रिकी पदवी, एमबीए, एमसीए प्रवेशांचे वेळापत्रक जाहीर

**पुणे :** राज्यातील चार वर्षे मुदतीच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्ष, तसेच पाच वर्षे मुदतीच्या अभियांत्रिकी तंत्रज्ञान एकात्मिक पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) शुक्रवारी जाहीर केले. त्यानुसार २८ जून ते ८ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागणार असून, १७ जुलैला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. सीईटी सेलने प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती परिपत्रकाद्वारे जाहीर केली. त्यानुसार २८ जून ते ८ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर २९ जून ते ९ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांना ई स्क्रुटिनीसह सुविधा केंद्र, छाननी केंद्रांचा पर्याय उपलब्ध असणार आहे. मात्र, सुविधा केंद्र, छाननी केंद्रासाठी ऑनलाइन वेळ निश्चित करून घेऊन त्या वेळेत पडताळणीची कार्यवाही पूर्ण करावी लागणार आहे. छाननी केंद्रांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. ८ जुलैनंतर नोंदणी केलेले, तसेच छाननी केंद्र, सुविधा केंद्र येथे ९ जुलैनंतर अंतिम केलेले अर्ज केवळ 'नॉन-कॅप' जागांसाठीच ग्राह्य धरण्यात येतील. त्यानंतर तात्पुरती गुणवत्ता यादी १२ जुलैला जाहीर करण्यात येणार आहे. या यादीबाबत काही आक्षेप, हरकती असल्यास ते १३ ते १५ जुलै या कालावधीत नोंदवता येणार आहेत. अंतिम गुणवत्ता यादी १७ जुलै रोजी जाहीर केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहिती https://cetcell.mahacet.org/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए), संगणक उपयोजन पदव्युत्तर पदवी (एमसीए) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचेही वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार २८ जून ते ८ जुलै या कालावधीत उमेदवारांना ऑनलाइन अर्ज नोंदणी करता येणार असून, अंतिम गुणवत्ता यादी १७ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सीईटी सेलने दिली. सीईटी सेलने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार ३० जून ते ९ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना कागदपत्र पडताळणी पूर्ण करावी लागणार आहे.

## कात्रजमध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी महिलांसह तिघे अटकेत

■ **महिलांकडू भारतीय पारपत्र, आधारकार्ड जप्त**

**पुणे :** कात्रज भागात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या दोन बांगलादेशी महिलांनी भारतीय पारपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड मिळविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बांगलादेशी महिलांसह तिघांना आंबेगाव पोलिसांनी अटक केली.

लिझा मकबूल शेख उर्फ खातून तस्लीमा मोफीजूर रेहमान (वय ३०), रिंकी देवी उर्फ खातून तमीना मकबूल मोरल (वय ३८, दोघी सध्या रा. सिद्धीविनयाक सोसायटी, आंबेगाव बुद्रुक,कात्रज मूळ रा. बांगलादेशी), प्रमो कुमार चौधरी (रा. फतेहपुर,नालंदा बिहार) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी पुणे, मुंबई, ठाणे परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी पकडले होते. बांगलादेशी नागरिकांवरुिद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. आंबेगाव बुद्रुक परिसरात बांगलादेशी महिला वास्तव्यास असल्याची माहिती पोलीस कर्मचारी सागर नारगे यांना मिळाली.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अंतर्गत लघु उद्योग व्यवसायासाठी थेट कर्ज योजना

**पुणे :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अंतर्गत लघु उद्योग व्यवसायासाठी थेट कर्ज योजना राबविण्यात येत असून त्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेचा लाभ मातंग समाज व त्यामध्ये अंतर्भाव असणाऱ्या मांग, मातंग, मिनी मादिग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी व मादिगा या १२ पोट जातींना घेता येणार आहे. अर्जदार पुणे जिल्ह्यातील रहिवासी असावा. वय १८ वर्षे पूर्ण व ५० वर्षाच्या आत असावे. सीबील क्रेडिट स्कोअर किमान ५०० असावा. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल. वेळोवेळी महामंडळाने घातलेल्या अटी, शर्ती बंधनकारक राहतील.

योजनेअंतर्गत १ लाख रुपयांच्या प्रकल्प मूल्यासाठी महामंडळाचे भागभांडवल ८५ हजार रुपये, अनुदान १० हजार रुपये, अर्जदाराचा सहभाग ५ हजार रुपये असून भागभांडवल रक्कमेवर ४ टक्के व्याजदर असणार आहे.

अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्डची छायांकित प्रत, व्यवसायासाठी आवश्यक जागेचा पुरावा, तीन पासपोर्ट आकाराची छायाचित्रे, व्यवसायाचे दरपत्रक, व्यवसायाकरीता आवश्यक जागेचा पुरावा, शैक्षणिक दाखला, अनुदान, कर्जाचा लाभ न घेतल्याबाबतचे स्वत:चे प्रतिज्ञापत्र, आधार क्र. जोडणी केलेल्या बँक खात्याचा तपशील, ग्रामसेवकाचे शासकीय योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबत प्रमाणपत्र, कर्ज अनुदानाचा लाभ न घेतल्याबाबत प्रतिज्ञापत्र, आधार क्र. जोडणी केलेल्या बँक खात्याचा तपशील, शाळेचा दाखला, दुकाने अनुज्ञप्ती/ उद्योग आधार जोडणे आवश्यक आहे.

## महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचनकौशल्य आणि शब्दसंख्येत झाली वाढ

■ **इंग्लिश एज सेकंड लॅग्वेज (ईएसएल) उपक्रम ठरतोय उपयुक्त**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेने २०२२ साली इयत्ता पहिली आणि दुसरीच्या वर्गापासून सुरू केलेल्या इंग्लिश एज सेकंड लॅग्वेज (ईएसएल) उपक्रमामुळे शाळांमध्ये एक सकारात्मक बदल घडतो आहे. या उपक्रमामुळे इंग्रजी हा विषय शिक्षक तसेच विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास, अभिव्यक्ती आणि आनंदाचे माध्यम ठरत आहे. आजपर्यंत २७ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेला हा उपक्रम सरकारी शिक्षणातील शिक्षक संचालित बदलांचे प्रभावी उदाहरण ठरत आहे.

या उपक्रमाअंतर्गत सुमारे २०० प्राथमिक शिक्षकांना मासिक कार्यशाळांमधून प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये फॉनिक्स, परस्परसंवाद, आणि प्रिंट-समृद्ध वर्गखोल्यांच्या निर्मितीवर भर देण्यात आला. हा उपक्रम शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवणारा ठरत आहे. याबाबत छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालयाच्या शर्मिष्ठा बाबर म्हणाल्या, 'या उपक्रमात सहभागी झाल्यानंतर जेव्हा मला इंग्रजी प्रॅक्टिस बुक मिळाले, तेव्हा सुरूवातीपासूनच मला बदल दिसू लागला. माझ्या वर्गातील इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांचे वाचनकौशल्य आणि शब्दसंपत्तीमध्ये वाढ झाली आहे. हे प्रशिक्षण कृतीवर आधारित असल्यामुळे आणि वर्गखोल्यांच्या गरजेनुसार रचना केल्यामुळे आम्हालाही इंग्रजी शिकवताना आनंद वाटत आहे.

### शिक्षक केंद्रित दृष्टिकोन

इंग्रजीची भीती आता विद्यार्थ्यांनाच नाही, तर शिक्षकांनाही उरलेली नाही, असे कन्या शाळा क्र. ३१, दापोडीचे शिक्षक सागर गायकवाड यांनी नमूद केले. प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणाऱ्या इंग्रजी प्रॅक्टिस बुकमुळे वाचनकौशल्य वाढले असून, ते आमच्या वार्षिक मूल्यमापनामध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे.

महापालिका शाळांमधील शिक्षकांच्या अभिप्रायावरून १० शिक्षकांनी मिळून ३०० पानी इंग्रजी प्रॅक्टिस बुक तयार केली आहे. ती तीन टप्प्यांमध्ये विभागलेली असून त्यामध्ये अक्षर ओळख, शब्द वाचन, वाक्य वाचन ते परिच्छेद वाचनापर्यंतचा समावेश करण्यात आला आहे. ही पुस्तकं अध्यापन व मूल्यमापन अशा दोन्ही गोष्टींसाठी वापरली जात आहेत.

### उपक्रमाचा विस्तार आणि परिणाम

उपक्रमाच्या यशामुळे आता इयत्ता ३, ४ आणि ५ मध्येही त्याचा विस्तार करण्यात आला आहे. नवीन प्रॅक्टिस बुक्स आणि प्रशिक्षण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये २० हून अधिक शिक्षक, टीच फॉर इंडियाचे फेलोज, विद्यार्थी आणि अधिकारी यांचे योगदान आहे.

ईएसएल तंत्रज्ञानाचा उपयोग आता इंग्रजीपुरताच न राहता मराठी व पर्यावरणशास्त्रासारख्या विषयांतही केला जात आहे. शिक्षक आता प्रश्नोत्तर पद्धती, ग्रुप स्टडी अशा विविध गोष्टींचा वापर करून शिकवण्याच्या पद्धतीत बदल करत आहेत.